

# निवडणूक आचारसंहिता आणि वाहन जप्ती

**सौ. सायली भोईर**
मुख्य कार्यकारी व सचिव
दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि.




सन २०२४ निवडणूकीचे वारे वाहू लागले, आचारसंहिता लागू झाली आणि पून्हा एकदा सालाबादप्रमाणे विभागीय सहनिबंधकांकडून नागरी सहकारी बँकांना त्यांची वाहने शासकीय कार्यालयात जमा करण्याच्या सूचना जारी झाल्या. सर्वात प्रथम 'दि विटा मर्चंट्स को-ऑप. बँकेने यासंदर्भात फेडरेशनला पत्रव्यवहार केला. त्यानुषंगाने यासंदर्भातील उच्च न्यायालयाच्या काही याचिका तपासल्या असता बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. विरुद्ध मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य या प्रकरणाचा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचा (याचिका क्र. ४५५/९८) निर्णय पाहण्यात आला.

या निर्णयानुसार निवडणूकीच्या कामकाजाच्या कारणास्तव एखाद्या नागरी सहकारी बँकांची अथवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची वाहने सरकारी अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतली असल्यास वाहने ताब्यात घेतल्याच्या दिवसापासून वाहने बँकेच्या ताब्यात पून्हा सुपूर्त करण्याच्या दिवसापर्यंत सदरहू बँका लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम १६१ अन्वये नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत.

या प्रकरणाची सविस्तर माहिती अशी की, सन १९९८ मध्ये जाहीर झालेल्या निवडणूकीच्यावेळी आचारसंहितेच्या नावाखाली मा. तहसिलदार, बीड यांनी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ४ वाहने ताब्यात घेतली. मा. तहसिलदारांच्या या कृतीविरोधात बँकेने मुंबई उच्च न्यायालयाच्या, औरंगाबाद खंडपीठापूढे याचिका दाखल केली व बँकेची कृती बेकायदेशीर असून बँकेला तीच्या वाहनांचा ताबा परत देणेसंदर्भात विनंती करण्यात आली.

लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम १६० व १६१ चा संदर्भ देऊन बँकेच्या वकिलांनी आपला मुद्दा मा. न्यायाधिशांसमोर मांडतना असे प्रतिपादन केले की, बँकेने निवडणूकीच्या कालावधीत आपल्या वाहनाचा गैरवापर केला आहे, असे स्पष्टपणे दर्शविल्यासच वाहनांचा ताबा घ्यावा, अन्यथा केवळ आचारसंहितेच्या नावाखाली जिल्हा निबंधक वा जिल्हाधिकाऱ्यांना बँकांची वाहने ताब्यात ठेवण्याचा कोणताही अधिकार नाही आणि जर अशी वाहने सक्तीने शासकीय अधिकाऱ्यांनी निवडणूकीच्या कालावधीत आपल्या ताब्यात ठेवल्यास त्या कालावधीकरिता बँकेला नुकसान भरपाई देण्यास संबंधित अधिकारी जबाबदार राहतील.

याविरुद्ध मा. राज्य निवडणूक आयोग, जिल्हाधिकारी, तहसिलदार इ. च्या वतीने अशी बाजू मांडण्यात आली की, बँकेच्या अधिकारी नसलेल्या व्यक्तींनी निवडणूकीच्या कालावधीत वाहनांचा गैरवापर करु नये व निवडणूक पारदर्शकपणे, मोकळ्या वातावरणात पार पाडल्या जाण्यात याकरिता बँकेची वाहने ताब्यात घेणे जरुरीचे आहे.




मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दोन्ही बाजू ऐकून घेऊन असा निकाल दिला की, निवडणूकीच्या वेळी केवळ आचारसंहितेच्या नावाखाली जिल्हाधिकारी वा तत्सम अधिकाऱ्यांनी बँकेची वाहने ताब्यात घेऊ नये. तसेच या कालावधीत बँकेकडून वाहनाचा दुरुपयोग झालेला आहे, असे स्पष्टपणे दर्शविणे जरुरीचे आहे. खंडपीठाने या याचिकेत असाही निकाल दिला की, निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी ताब्यात घेतलेल्या वाहनाचा उपयोग निवडणूकीच्या कामाकरिताच झाला पाहिजे. त्यामुळे बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची जमा करुन घेतलेली वाहने निवडणूकीच्या कामकाजाकरिता वापरली जाणार असल्याने निवडणूकीच्या कालावधीत सदर वाहनांचा ताबा परत बँकेस देण्याचा आदेश उच्च न्यायालयाने केला नाही. मात्र वाहने ताब्यात घेतलेल्या दिवसापासून त्यांचा ताबा पून:श्च बँकेस देईपर्यंतच्या कालावधीकरिता नियमाप्रमाणे बँकेस नुकसान भरपाई देण्याचा आदेश खंडपीठाने मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांना दिला.

वरील याचिकेप्रमाणेच मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर निवडणूकीच्या कालावधीत आचार संहितेच्या नावाखाली एखाद्या सहकारी बँकेची वाहने तहसिलदार, जिल्हाधिकारी, विभागीय सहनिबंधक इ. सरकारी अधिकाऱ्यांना ताब्यात घेता येईल का? असा प्रश्न याचिका क्र. २७२/१९९८ (निकाल दि. २३ जानेवारी, १९९८) द्वारे उपस्थित झाला असता लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम १६० व १६१ मधील तरतूदींचा आढावा घेत खंडपीठाने असा निष्कर्ष काढला की, निवडणूकीच्या काळात एखाद्या सहकारी बँकेने आपल्याकडील वाहनांचा दुरुपयोग निवडणूकीकरिता केला, असे स्पष्टपणे निदर्शनास आल्यावरच उपरोक्त कायद्यातील कलम १६० मधील तरतूदींचे पालक करुन संबंधित अधिकाऱ्यांना बँकेची वाहने ताब्यात घेता येतील अन्यथा नाही. तद्नंतर ताब्यात घेतलेल्या वाहनांचा ताबा परत बँकेस देण्यात यावा, असा आदेश खंडपीठाने संबंधित सरकारी अधिकाऱ्यांना दिला.

वरील दोन्ही मा. उच्च न्यायालयांनी दिलेल्या निकालाच्या आधारावर सरकारी अधिकाऱ्यांना निवडणूकीच्या कालावधीत आचासंहितेच्या नावाखाली सहकारी बँकांची वाहने ताब्यात घेता येत नाहीत.

*****